# अनाधिकृत बांधकाम करणाऱ्या ३७ जणांविरुध्द गुन्हे

नांदेड दि. १४ : शहरातील सहा क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत मंजूर नकाशाविरुध्द अथवा विनापरवानगी बांधकाम करणाऱ्या ३९ मालमत्ताधारकांविरुध्द शहरातील विविध पोलिस ठाण्यात गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. मनपा आयुक्त डॉ. निपुण विनायक यांनी गेल्या दि. ५ रोजी घेतलेल्या आढावा बैठकीत अनाधिकृत बांधकाम करणाऱ्याविरुध्द कारवाई केली नाही तर संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करण्याचा इशारा दिला होता. त्याची दखल घेऊन इमारत निरीक्षकांनी गेल्या नऊ दिवसात तब्बल २४ गुन्हे दाखल केले आहेत.

क्षेत्रीय कार्यालय क्रं १ अंतर्गत एकुण नऊ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. क्षेत्रीय कार्यालय क्रं २ अंतर्गत ३ गुन्हे तर क्षेत्रीय कार्यालय क्र ३ अंतर्गत ९ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. क्षेत्रीय कार्यालय क्र ४ अंतर्गत ६ तर क्षेत्रीय कार्यालय क्र. ५ व ६ अंतर्गत प्रत्येकी ५ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. ज्यांची अनाधिकृत किंवा मंजूर नकाशाविरुध्द सुरु असलेली बांधकामे थांबवली आहेत, अशांनी नियमानुसार बांधकाम करावे. नियमाविरुध्द बांधकाम करणाऱ्या मालमत्ताधारकाविरुध्द गुन्हे नोंदविण्याची मोहिम सुरुच राहील, असे महापालिकेच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडुन सांगण्यात आले.